# आपलं सांज सह्याद्री टाइम्स

सायं दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष २४ ■ अंक १३३ ■ शुक्रवार, दि.२ ऑक्टोबर २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रु. RNI No. MAHMAR/2003/10715 Website: aaplasanjsahyadritimes.com संस्थापक संपादक:संदीप काळे

Evening daily ■ Aapla Sanj Sahyadri Times ■ Chhatrapati SambhajiNagar ■ Vol.24 ■ Issue 133 ■ FRIDAY, 02 OCTOBER 2026 ■ Page 4 ■ Price. ₹1 ■ RNI NO.MAHMAR/2003/10715





जाहिर प्रगटन,पासपोर्टसाठी चेंज ऑफ नेम जाहिरातीसाठी संपर्क साधावा.अल्पदरात जाहिरात प्रसिद्ध केल्या जातील.

जाहिरातीसाठी संपर्क

8459270916


# शेगावहून देवीची मूर्ती घेऊन जाताना तरुणांवर काळाचा घाला

## समृद्धीवर भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू







**अमरावती,प्रतिनिधी:**

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वेजवळ शुक्रवारी (२ ऑक्टोबर) पहाटे समृद्धी महामार्गावर ट्रक आणि टेम्पो-पिकपमध्ये भीषण अपघात झाला आहे. या भीषण अपघातात तब्बल ७ जणांचा जागीच मृत्यू झाला असून यामध्ये १८ हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. समृद्धी महामार्गावरील चॅनेल क्रमांक ९७ जवळ हा अपघात झाला आहे. मृतांमधील सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे येथील रहिवासी होते. अपघाताची माहिती मिळताच, स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले.

मिळालेल्या माहितीनुसार, २० ते २५ जण नवरात्रौत्सवासाठी शेगाववरून दुर्गादेवीची मूर्ती घेऊन वर्ध्याला जात होते.वर्धा येथील सिंदी मेघे परिसरातील सार्वजनिक दुर्गा पूजा उत्सव समितीचे २५ ते ३० कार्यकर्ते टेम्पो-पिकअप वाहनाने शेगाववरून दुर्गा माता मूर्ती घेऊन वर्ध्याकडे परतत होते. मध्यरात्री १ ते पहातेच्यापहाटेच्या सुमारास त्यांच्या वाहनाला एका ट्रकने पाठीमागून भीषण धडक दिली. याची भीषणता इतकी होती की, वाहनाचा चक्काचूर झाला आणि काही कार्यकर्ते थेट महामार्गाच्या बाजूला फेकले गेले. अपघातातील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमींवर तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील गंभीर उपचारांसाठी वर्ध्याच्या सावंगी येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात आणि वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या मंगरूळ दस्तगीर पोलीस आणि स्थानिक प्रशासन घटनास्थळी पोहोचले असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. यावेळी ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम, धामणगाव नगराध्यक्ष अर्चना रोठे रुग्णालयात जाऊन जखमी रुग्णाची विचारपूस केली.

या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांकडून घटनेची सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.गेल्या ६ ते ८ महिन्यात अनेक भीषण अपघात समृद्धी महामार्गावर झाले आहेत. या अपघातांमध्ये अनेक निष्पाप लोकांचे जीव गेल्याचेही समोर आले. २० जुलै रोजी वर्ध्याच्या विरुळजवळ एका मालवाहू वाहनाने कारला मागून धडक दिली, ज्यामुळे गाडीने पेट घेतला. यामध्ये गाडीतील आणि मालवाहू वाहनातील एकूण ५ जणांचा मृत्यू झाला. ऑगस्ट महिन्यातच छत्रपती संभाजीनगरजवळील वैजापूर परिसरात समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल्सची कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक बसून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू आणि १० जण गंभीर जखमी झाले. ७ सप्टेंबर रोजी मेहकर परिसरात नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एका गाडीने चॅनेल क्रमांक २६३जवळ म्हणजेच डोणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिली. यात एकाचा मृत्यू झाला तर दोघे जखमी झाले. यंदाच्या वर्षी पहिल्या ८ महिन्यात समृद्धी महामार्गावर १४२ अपघातांची नोंद झाली. यामध्ये १२८ जणांचा मृत्यू झाला आहे.

## मुंबईचा प्रवास महागणार; व्यावसायिक वाहनांना टोलवाढीचा फटका

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** मुंबईकडे ये-जा करणाऱ्या वाहनधारकांच्या खर्चात आता वाढ होणार आहे. मुंबईच्या पाच प्रमुख प्रवेशद्वारांवरील टोलनाक्यांवर १ ऑक्टोबरपासून सुधारित टोल दर लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वाशी, ऐरोली, मुलुंड, एलबीएस आणि दहिसर येथील टोलनाक्यांवर काही वाहनांच्या टोलमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरहून मुंबईकडे जाणाऱ्या व्यावसायिक वाहनांना आता पूर्वीपेक्षा अधिक टोल द्यावा लागणार असून, त्याचा परिणाम वाहतूक खर्चावरही होण्याची शक्यता आहे.

नव्या दरानुसार मिनी बस आणि हलकी व्यावसायिक वाहने (एलसीव्ही) यांच्यासाठी ९० रुपये, ट्रक आणि बससाठी १८० रुपये, तर अवजड वाहनांसाठी २२५ रुपये टोल आकारला जाणार आहे. वाहनांच्या प्रकारानुसार टोलमध्ये १५ ते ३५ रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे मुंबईकडे मालवाहतूक किंवा प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या प्रत्येक फेरीचा खर्च वाढणार आहे.

मुंबईतील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान करण्यासाठी एमएसआरडीसीने शहरातील विविध भागांत ५५ उड्डाणपूल उभारले आहेत. या उड्डाणपुलांच्या बांधकामासाठी झालेला खर्च वसूल करण्यासाठी मुंबईच्या प्रमुख प्रवेशद्वारांवर पथकर आकारला जातो. वाशी, ऐरोली, मुलुंड, एलबीएस आणि दहिसर या पाच ठिकाणी पथकर नाके कार्यरत आहेत. मुंबईत प्रवेश करताना किंवा शहरातून बाहेर पडताना या मार्गांचा वापर करणाऱ्या वाहनांना निर्धारित दरानुसार टोल भरावा लागतो.दरम्यान, हलकी खासगी वाहने, शालेय वाहने तसेच एसटी आणि बेस्टच्या बसना ऑक्टोबर २०२४ पासून टोलमाफी देण्यात आली आहे. सुधारित दर लागू झाल्यानंतरही ही टोलमाफी कायम राहणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य खासगी वाहनधारकांना या निर्णयाचा थेट आर्थिक फटका बसणार नसला, तरी व्यावसायिक वाहतूक करणाऱ्या वाहनांवरील खर्च वाढणार आहे.



## उपविभागीय अधिकारी नीलम बाफना,तहसीलदार ज्योती पवार यांनी केली दुष्काळग्रस्त पिकांची बांधावर जाऊन पाहणी

**आडुळ,प्रतिनिधी:**पैठण तालुक्यातील आडुळ परिसरात दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस गंभीर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, पाणीटंचाई निवारणासह पिकांची प्रत्यक्ष सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी प्रशासकीय पथकाने गुरुवारी (ता. ०१) आडूळ येथे भेट देऊन पाहणी केली. पैठणच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन करपलेल्या पिकांची पाहणी केली; तसेच पाण्याची घटती पातळी व शेतकऱ्यांसमोरील अडचणींची सविस्तर माहिती घेतली. यानंतर पथकाने गावातील मुख्य पाझर तलाव आणि सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या विहिरीला भेट देऊन उपलब्ध पाणीसाठ्याची खात्री केली, वाढत्या उन्हामुळे पाणी पातळी झपाट्याने खालावत असल्याने संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी विहिरींचे अधिग्रहण किंचा आवश्यकतेनुसार टँकरचे नियोजन करण्याच्या दृष्टीने ही पाहणी महत्त्वाची ठरणार आहे. दौऱ्यात नायब तहसीलदार भारती मादनकर, मंडळ अधिकारी वैशाली बैनवाड, उपसरपंच भाऊसाहेब पिवळ, पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब कोल्हे यांच्यासह शीतल कासलीवाल, अझीम शेख, पांडुरंग काळे, ग्रामसेवक एन. एस. गाढेकर, अश्पाक शहा आदी ग्रामस्थ व अधिकारी उपस्थित होते.

## २० राज्यांत वगळलेल्या मतदारांची पुन्हा नोंदणी होणार

**नवी दिल्ली,प्रतिनिधी:**विशेष सखोल पुनरिक्षण म्हणजेच SIR प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून काही नावे वगळली गेल्याच्या वादाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मतदार यादीतून वगळले गेलेले पात्र मतदार, पहिल्यांदा मतदान करणारे तरुण आणि युवा मतदार यांची नावे पुन्हा यादीत समाविष्ट करण्यासाठी २० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.यासाठी आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठवून आवश्यक सूचना दिल्या आहेत. या मोहिमेत बूथ लेव्हल अधिकारी घराघरांत जाऊन मतदारांची माहिती तपासणार आहेत.या मोहिमेअंतर्गत BLO सध्याच्या मतदार यादीची SIRपूर्वीच्या मतदार यादीशी तुलना करतील.SIRपूर्वीच्या यादीत नाव असले, मात्र सध्याच्या यादीत नाव नसलेल्या मतदारांची स्वतंत्र यादी तयार केली जाणार आहे.यानंतर BLO संबंधित मतदारांच्या घरी जाऊन त्यांची सध्याची परिस्थिती जाणून घेतील. संबंधित व्यक्ती मतदार म्हणून पात्र असल्याचे आढळल्यास त्यांच्याकडून फॉर्म-६ भरून घेतला जाईल. या माध्यमातून त्यांचे नाव पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया केली जाईल.

## महात्मा गांधी, लालबहादुर शास्त्री जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:**

---------------

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, तहसिलदार,नायब तहसिलदार व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.



## महिला रिकर्व्ह प्रकारात पहिले सुवर्णपदक तर लवलिनाचा गोल्डन पंच

**नवी दिल्ली :** सध्या जपानमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये रिकर्व्ह महिला सांघिक प्रकारात भारतीय संघाने सुवर्णपदक जिंकत इतिहास घडवला. अंतिम फेरीत भारताने बलाढ्य दक्षिण कोरियाचा पराभव करत या प्रकारातील आपले पहिलेवहिले सुवर्णपदक पटकावले. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारताला याआधी महिला सांघिक रिकर्व्ह प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेशही मिळवता आला नव्हता. पण, शुक्रवारी (२ ऑक्टोबर) अंकिता भकत, कीर्ती आणि कुमकुम अनिल मोहोड या भारतीय त्रिकुटाने अंतिम फेरीत धडक मारत कांग चाएयॉन्ग, ली युनजी आणि ओ येजिन यांच्या दक्षिण कोरियन संघाला पराभूत केले आणि इतिहास रचला.आशियाई क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात भारताला याआधी महिला सांघिक रिकर्व्ह प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेशही मिळवता आला नव्हता. पण, शुक्रवारी (२ ऑक्टोबर) अंकिता भकत, कीर्ती आणि कुमकुम अनिल मोहोड या भारतीय त्रिकुटाने अंतिम फेरीत धडक मारत कांग चाएयॉन्ग, ली युनजी आणि ओ येजिन यांच्या दक्षिण कोरियन संघाला पराभूत केले आणि इतिहास रचला.

# शेतकरी चिंता'तूर'!



डाळी महागल्याने प्रत्येक घरातील खर्चही महागणार

**दुष्काळकळा**

» अर्चना काळे-पंडित

**भाग-४**

**पा**वसाळा संपला. परंतु मराठवाड्यात अत्यल्प पाऊस झाला. याचा फटका तूर पिकाला बसला. काही ठिकाणी उत्पन्न तर सोडाच पण शेतकऱ्यांना काढणीचा अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे हाती काहीच येणार नसून उलट पदरमोड करावी लागणार आहे. परिणामी, शेतकरी चिंतातूर झाले आहेत.यंदाच्या खरीप हंगामात तुरीचे संकट मात्र सोयाबीनपेक्षा काहीसे वेगळे आहे. सोयाबीनची काढणी जवळ आली असताना नुकसान स्पष्ट दिसू लागले; तुरीचे पीक तुलनेने उशिरा काढणीला येते. त्यामुळे यंदा तुरीचे अंतिम नुकसान अजून पूर्णपणे समोर आलेले नसले, तरी पावसाच्या खंडामुळे उत्पादनाची क्षमता कमी झाल्याची चिंता आधीच निर्माण झाली आहे. त्यात कोरडवाहू शेतातील पीक वाळून गेले आहे. पण मुद्दा हा आहे की,तुरीचे उत्पादन कमी झाले, तर त्याचा परिणाम फक्त तूर उत्पादक शेतकऱ्यावर होणार नाही. तूर डाळीच्या किमतीपासून ग्राहकाच्या महिन्याच्या किराणा बजेटपर्यंत त्याची साखळी पोहोचते.

तूर हे मराठवाड्यातील महत्त्वाचे कडधान्य पीक. कमी पाण्यावर येणारे पीक म्हणून त्याची ओळख असली तरी तुरीला पाणी लागत नाही असा त्याचा अर्थ नाही. तुरीला पिकाच्या वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये जमिनीत पुरेसा ओलावा आवश्यक असतो. पेरणीनंतर उगवण आणि सुरुवातीची वाढ, त्यानंतर फांद्या फुटणे, फुलोरा, शेंगधारणा आणि दाणे भरणे या प्रत्येक टप्प्याला पावसाचे वेगळे महत्त्व आहे. विशेषतः फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या काळात पाण्याचा ताण आला तर अंतिम उत्पादनावर परिणाम होऊ शकतो.यंदा मराठवाड्यातील अनेक भागांत नेमका हा प्रश्न निर्माण झाला. पाऊस झाला, पण त्यात मोठे खंड पडले. काही ठिकाणी पावसाची सुरुवात चांगली झाली; त्यानंतर दीर्घ काळ पाऊस गायब झाला. सप्टेंबरमध्ये काही भागांत पुन्हा पाऊस झाला; मात्र तोपर्यंत पिकाच्या काही महत्त्वाच्या अवस्था पार झाल्या होत्या. म्हणून उशिराचा पाऊस हा तुरीसाठी नेहमीच आधीच्या पावसाच्या कमतरतेची भरपाई करू शकत नाही.तुरीच्या शेतात फुलोरा दिसला की शेतकऱ्याला उत्पादनाची आशा निर्माण होते. पण त्या फुलांपैकी किती फुले शेंगांमध्ये रूपांतरित होतात आणि तयार झालेल्या शेंगांमध्ये किती दाणे भरतात, हे अधिक महत्त्वाचे आहे. पाण्याचा ताण, उष्णता आणि हवामानातील बदल यांचा या प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. पिकाला आवश्यक त्या वेळी पुरेसा ओलावा मिळाला नाही तर फुलगळ होऊ शकते, शेंगांची संख्या कमी होऊ शकते किंवा शेंगा अपुऱ्या भरू शकतात.यामुळे यंदा तुरीचे नुकसान मोजताना केवळ बाधित क्षेत्र पाहणे पुरेसे ठरणार नाही. प्रति हेक्टर अपेक्षित उत्पादन आणि प्रत्यक्ष मिळणारे उत्पादन यातील फरक मोजावा लागेल. याच कारणामुळे तुरीच्या पंचनाम्यांमध्ये उभ्या पिकाची स्थिती, शेंगांची संख्या आणि संभाव्य उत्पादन यांचा शास्त्रीय अंदाज महत्त्वाचा ठरेल.

### मराठवाड्याच्या शेतकऱ्यासाठी तूर महत्त्वाची का?

सोयाबीन किंवा कापसाप्रमाणे तुरीचे क्षेत्र सर्वत्र सारखे नसले तरी मराठवाड्यातील अनेक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पीकपद्धतीत तुरीला महत्त्वाचे स्थान आहे.तूर अनेकदा आंतरपीक म्हणून घेतली जाते. सोयाबीन-तूर, कापूस-तूर अशा पद्धतींमध्येही तिची लागवड होते. त्यामुळे एखाद्या शेतकऱ्याच्या एका पिकाचे नुकसान झाले तरी दुसऱ्या पिकातून काही प्रमाणात उत्पन्न मिळण्याची आशा असते. पण, जेव्हा पावसाचा ताण एकाच वेळी अनेक पिकांवर येतो, तेव्हा हा आधारही कमकुवत होतो. यंदाच्या खरीपात मराठवाड्यातील शेतकऱ्यांसमोर म्हणूनच प्रश्न केवळ तुरीचा नाही. सोयाबीनचे उत्पादन घटले, कापसाचे गणित बिघडले आणि तुरीकडून असलेली अपेक्षाही कमी झाली, तर एकूण खरीप उत्पन्न किती उरेल? हा मोठा प्रश्न आहे.

### उत्पादन घटले तर भाव वाढणार; पण शेतकऱ्याला फायदा होणार का?

तुरीच्या बाबतीत बाजाराचे गणित विशेष महत्त्वाचे आहे. उत्पादन कमी झाले तर बाजारात आवक कमी होऊ शकते. पुरवठा घटला तर दर वाढण्याची शक्यता असते. सध्या कडधान्यांच्या घाऊक दरात वाढ झाल्याचे बाजारातील अहवाल सांगतात. पावसाअभावी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील तूर उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पण इथे पुन्हा शेतकऱ्याच्या उत्पन्नाचे मूलभूत गणित समजून घ्यावे लागते. समजा एका शेतकऱ्याला सामान्य वर्षी एका एकरातून आठ क्विंटल तूर मिळते. यंदा उत्पादन पाच क्विंटलवर आले आणि बाजारभाव वाढला, तरी त्याच्याकडे विकण्यासाठी तीन क्विंटल कमी तूर आहे.म्हणूनच, जास्त भाव = जास्त उत्पन्न हे समीकरण तुटू शकते. शेतकऱ्याच्या दृष्टीने खरी गोष्ट आहे : उत्पादन÷प्रत्यक्ष मिळालेला भाव एकूण खर्च = निव्वळ उत्पन्न. उत्पादनात मोठी घट झाली तर दरातील वाढ त्याची पूर्ण भरपाई करेलच असे नाही.

### एमएसपी वाढवून सरकारने दिलासा दिला

केंद्र सरकारने २०२६-२७ खरीप विपणन हंगामासाठी तुरीचा किमान आधारभूत दर ८,४५० रुपये प्रतिक्विंटल निश्चित केला आहे. मागील वर्षाच्या ८,००० रुपयांच्या तुलनेत यंदा ४५० रुपयांची वाढ झाली आहे. एमएसपी वाढल्यामुळे तूर उत्पादकाला किंमत संरक्षणाची एक चौकट उपलब्ध होते. मात्र एमएसपी जाहीर असणे आणि प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्यक्ष त्या दराने तूर विकता येणे यात फरक आहे. शेतकऱ्याला बाजारात योग्य दर मिळण्यासाठी खरेदी केंद्र वेळेवर सुरू होणे, नोंदणी, गुणवत्ता निकष, वजन, वाहतूक आणि प्रत्यक्ष देयक या सगळ्या प्रक्रिया सुरळीत असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ हा राज्यात नाफेड, एनसीसीएफ आणि भारतीय अन्न महामंडळाच्या वतीने कडधान्ये आणि तेलबियांची खरेदी करण्यासाठी नोडल संस्थेच्या भूमिकेत काम करतो. ही खरेदी केंद्राच्या निर्धारित दरांनुसार केली जाते. म्हणजेच यंदा तूर उत्पादकांसाठी पीक वाचवण्याइतकेच योग्य वेळी हमीभावाची खरेदी उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे.

### सरकारसमोर तुरीचे दुहेरी आव्हान

तूर ही केवळ शेतकऱ्याची बाजारातील वस्तू नाही. ती देशाच्या अन्नसुरक्षेशी संबंधित आहे. भारतात डाळींच्या मागणीच्या तुलनेत देशांतर्गत उत्पादनात चढ-उतार होत असल्याने केंद्र सरकारने तूर, उडीद आणि मसूर यांचे उत्पादन वाढवण्यावर आणि सरकारी खरेदी मजबूत करण्यावर भर दिला आहे. केंद्राच्या धोरणानुसार २०२८-२९ पर्यंत या तीन कडधान्यांच्या उत्पादनाची १०० टक्के सरकारी खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याचा अर्थ असा की तुरीच्या बाबतीत सरकारसमोर दोन प्रश्न एकाच वेळी आहेत. शेतकऱ्याला उत्पादनासाठी प्रोत्साहन आणि योग्य भाव द्यायचा; आणि दुसरीकडे ग्राहकांसाठी डाळींच्या किमती नियंत्रणात ठेवायच्या. दुष्काळाच्या वर्षी हे संतुलन अधिक कठीण होते. तूर कमी झाली तर डाळ महागते.तुरीच्या शेतात झालेले नुकसान बाजारात पोहोचण्यासाठी काही महिने लागतात. पण, त्याचा परिणाम शेवटी ग्राहकाला जाणवतो. शेतातील उत्पादन घटते. बाजारातील आवक कमी होते. घाऊक दर वाढतात. डाळ मिलचा कच्चा माल महागतो. प्रक्रिया आणि वाहतूक खर्च जोडला जातो. आणि शेवटी किरकोळ बाजारातील तूरडाळ महागते. यंदा सणासुदीच्या आधीच विविध कडधान्यांच्या घाऊक दरात वाढ झाल्याचे बाजार विश्लेषण समोर आले आहे. तुरीचे उत्पादन महाराष्ट्र आणि कर्नाटकातील पावसाच्या कमतरतेमुळे कमी होण्याची शक्यता त्यामागील घटकांपैकी एक म्हणून नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे तुरीचा दुष्काळ हा शेतकऱ्यापासून ग्राहकापर्यंत जाणारा दुष्काळ आहे.

### दुष्काळग्रस्त तूर उत्पादकांसाठी शासनाच्या उपाययोजना

राज्य सरकारने २६ सप्टेंबरला राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले आहेत. या निर्णयामुळे दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार संबंधित भागात विविध सवलती आणि मदत उपाययोजना लागू झाल्या आहेत. यामध्ये पीककर्जाचे पुनर्गठन, कृषी कर्जवसुलीस स्थगिती, जमीन महसुलात सवलत आणि कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलती यांचा समावेश आहे. तसेच पिण्याचे पाणी, चारा आणि रोजगार हमीच्या कामांबाबतही उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पीक नुकसानीचे पंचनामे जीपीएस-आधारित छायाचित्रांसह करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या प्रत्यक्ष नुकसानमूल्यांकनानंतर पीक नुकसानीसाठी स्वतंत्र आर्थिक मदतीचा निर्णय घेतला जाणार आहे. याचा तूर उत्पादकासाठी थेट अर्थ असा की, तुरीचे प्रत्यक्ष नुकसान अचूक नोंदवले जाणे हा पुढील मदतीचा पहिला टप्पा आहे. दुष्काळग्रस्त भागात कर्जवसुलीला मिळणारी स्थगिती किंवा कर्जाचे पुनर्गठन यामुळे शेतकऱ्याला तात्पुरता आर्थिक श्वास मिळू शकतो. मात्र त्यातून पीक गेलेले नुकसान भरून निघत नाही. त्यामुळे पंचनाम्यानंतरची आर्थिक मदत किती, कधी आणि कोणत्या निकषांवर मिळते, हे तितकेच महत्त्वाचे राहणार आहे. सध्या सरकारने पीकनुकसान भरपाईचा अंतिम निर्णय पंचनाम्यांनंतर घेण्याचे स्पष्ट केले आहे.

# संपादकीय

## पदकांची वाढती झेप,भारतीय क्रीडाशक्तीचा नवा चेहरा

आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची पदकांसाठी सुरू असलेली झुंज आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. स्पर्धेचे आणखी काही दिवस बाकी असतानाच भारताने विविध क्रीडा प्रकारांत पदके मिळवत आपली उपस्थिती ठळकपणे नोंदवली आहे. नेमबाजी, तिरंदाजी, थलेटिक्स, कुस्ती, नौकानयन, स्क्वॉश, बॉक्सिंग आणि सांघिक खेळ अशा अनेक क्षेत्रांत भारतीय खेळाडूंची कामगिरी दिसून येत आहे. १ ऑक्टोबरला भारताने सहा पदकांची भर घातली. त्याच दिवशी पुरुष हॉकी संघाने पाकिस्तानवर विजय मिळवत अंतिम फेरी गाठली, तर क्रिकेट संघाने श्रीलंकेचा मोठ्या फरकाने पराभव करून सुवर्णपदकाच्या लढतीत प्रवेश केला.

या स्पर्धेतील भारताच्या कामगिरीचे वैशिष्ट्य केवळ पदकांची संख्या नाही, तर पदके मिळवून देणाऱ्या खेळांची वाढती व्याप्ती आहे. नेमबाजी आणि थलेटिक्समध्ये सातत्याने पदके मिळत असतानाच तिरंदाजी, नौकानयन आणि इतर तुलनेने कमी चर्चेत असलेल्या क्रीडा प्रकारांतही भारतीय खेळाडू पुढे येत आहेत. महिलांच्या चारशे मीटर रिले संघाने सुवर्णपदक जिंकले, तर गुलवीर सिंहने या स्पर्धेत तीन पदके मिळवत आपली कामगिरी विशेष ठरवली आहे. नेहरू धांडा यांनी महिलांच्या ट्रॅप प्रकारात सुवर्णपदक जिंकून वैयक्तिक कामगिरीची नवी नोंद केली.

सांघिक खेळांमधील कामगिरीही भारतीय क्रीडाक्षेत्राच्या वाढत्या आत्मविश्वासाचे चित्र दाखवते. पुरुष हॉकी संघाने पाकिस्तानविरुद्धच्या उपांत्य सामन्यात ४-३ असा विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. क्रिकेटमध्ये भारताने श्रीलंकेला अवघ्या ४५ धावांत गुंडाळत १२४ धावांचा मोठा विजय मिळवला आणि अंतिम सामन्यात पाकिस्तानविरुद्ध लढतीची तयारी केली. या दोन्ही विजयांमुळे भारतीय क्रीडाक्षेत्रात सांघिक खेळांबाबतची अपेक्षा पुन्हा वाढली आहे. मात्र पदकांच्या या आनंदात काही बाबींकडे दुर्लक्ष होता कामा नये. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची कामगिरी अनेक खेळांत चांगली होत असली, तरी प्रत्येक क्रीडा प्रकारातील सातत्य समान नाही. टेनिसमध्ये भारताला यंदा एकही पदक मिळाले नाही. गेल्या चार दशकांत प्रथमच अशी स्थिती निर्माण झाली आहे. एखाद्या स्पर्धेत पदक मिळाले नाही म्हणून त्या खेळातील खेळाडूंना दोष देण्यापेक्षा त्या क्रीडा प्रकाराच्या पायाभूत सुविधा, प्रशिक्षणपद्धती, युवा खेळाडूंची निर्मिती आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा अनुभव यांचा दीर्घकालीन विचार करण्याची गरज आहे.आशियाई क्रीडा स्पर्धा ही ऑलिम्पिकची रंगीत तालीम मानली जाते. त्यामुळे येथे मिळणाऱ्या पदकांपेक्षा त्यातून भविष्यातील क्षमता ओळखणे अधिक महत्त्वाचे आहे. कोणता खेळाडू सातत्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर टिकतो, कोणत्या खेळात पुढची पिढी तयार होत आहे आणि कुठे अजून मोठी पोकळी आहे, याचा अभ्यास या स्पर्धेनंतर झाला पाहिजे. केवळ पदक जिंकल्यानंतर होणारा सत्कार आणि बक्षिसांपुरती क्रीडा व्यवस्था मर्यादित राहता कामा नये.विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागातील खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, मैदान, क्रीडा साहित्य, पोषण आणि वैद्यकीय सुविधा मिळणे आवश्यक आहे. आज आशियाई स्तरावर पदक जिंकणारा खेळाडू उद्या ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करू शकतो. त्यामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेतील प्रत्येक पदकाकडे पुढील मोठ्या ध्येयाची पायरी म्हणून पाहिले पाहिजे.यंदाच्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे. भारतीय क्रीडा आता काही मोजक्या खेळांपुरती राहिलेली नाही. विविध खेळांतील खेळाडू पदकाच्या शर्यतीत उतरले आहेत आणि अनेकांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. आता या कामगिरीचे रूपांतर सातत्यपूर्ण क्रीडाशक्तीत करण्याची जबाबदारी व्यवस्था, प्रशिक्षक आणि क्रीडा संघटनांची आहे. मैदानावर खेळाडू आपले काम करत आहेत; त्यांच्या या झेपेला मजबूत व्यवस्था आणि दूरदृष्टीची जोड मिळाली, तर आशियाई पदकांपासून ऑलिम्पिकच्या सर्वोच्च व्यासपीठापर्यंतचा प्रवास अधिक भक्कम होऊ शकतो.

'सह्याद्री'च्या कुशीत

संयोजक: श्री प्रकाश जडे

# भटकंती....



**वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे,**
**घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे**
**कधी बाजारी तर कधी नदीच्या काठी**
**राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी**
**हळू थबकत जावे, कधी कानोसा घेत**
**कधी रमत गमत वा कधी भरारी घेत**

लहानपणी बालभारतीच्या पुस्तकात ही कविता होती. वर्गातील मित्र-मैत्रिणींच्या समवेत, शिकवणाऱ्या बाईच्या मागोमाग ही कविता सुरात म्हणताना मजा यायची.त्यावेळी त्या वयाला उमजेल इतकाच सोपासा अर्थ कळला होता या कवितेचा. खरा अर्थ तर आता कळतो आहे, मोठे झाल्यावर. मोठेपणी असतात ते मोठेपणाचे व्याप मागे लागल्यावर. कसल्या कसल्या कामांमध्ये, उद्योगांमध्ये, संसाराच्या पाशात गुरफटून गेलेले असताना नकळतच कधी असं स्वैर व्हावं वाटतं. कुठं तरी निघून जावं आणि तिकडेच रमावं वाटतं.आदिम काळी भटक्या असणाऱ्या माणसाला कुठल्या तरी क्षणी असं वाटलं असणार की आता एका जागी स्थिर व्हावं. एका जागी राहून काही तरी साध्य करावं. पण एका जागी राहून येणारा स्थिरपणाही माणसाला रुचत नाही. रोजचा तोच तोचपणा नको वाटतो. आहे त्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावं, नेहमी करतो, त्यापेक्षा वेगळं काही करावं असं त्याला नंतर वाटतंच. नव्या प्रदेशाचे नावीन्य खुणावतंच. काही काळ तिथे घालवल्यावर पुन्हा आपलं घरटं त्याला ओढ लावतं. हे असं करणं माणसाची मूळ प्रवृत्ती किंवा आदिम वृत्तीच असावी. इतिहासाकडे पाहिलं कि हे लक्षात येतंच.भ्रमंती, मुशाफिरी, भटकंती, फिरस्ती, प्रवास, फिरणे, चक्कर टाकणे, मोहीम, फिरफटका, सफर, गमन, फेरी, सहल, दौरा, पायपीट, मुलुखगिरी, वारी, पर्यटन, रपेट, भटकणे हे शब्द म्हणजे एकाच रंगाच्या अनेक छटा असतात. तसे एकाच अर्थाचे पण एकमेकांपेक्षा खूपच भिन्न, वेगळेपण असणारे.सह्याद्रीचा वारा मनसोक्त पीत, नेटाने गडकिल्ल्यांवर जाणं म्हणजे भ्रमंती. विशिष्ट पात्रता आणि अनुभव असल्याने, त्यांच्या प्रगल्भ जाणिवांनी घेतलेला प्रवासाचा आणखीन एक अनुभव म्हणजे मुशाफिरी. पाण्यासाठी दुष्काळग्रस्त भागातील माउली डोक्यावर हंडे घेऊन करते ती पायपीट. सवयीने , कंटाळा आला म्हणून मित्राच्या घरी होते ती चक्कर. मंत्री बराच लवाजमा घेऊन परदेशात करतात तो दौरा, उपजीविकेसाठी आज इथे तर उद्या तिथे अशी करावी लागते ती फिरस्ती. कोकण, केरळ, काश्मीर असं अमूक तमूक ठिकाणी जाणं म्हणजे पर्यटन. घोड्यावरून जाणं म्हणजे रपेट. शिवाजी महाराजांनी केली ती मुलूखगिरी , मोहिमा . मुंबईवरून दिल्ली असं एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाताना होतो तो प्रवास. कंटाळा आल्यावर जवळच्या बागेत मारतो तो फेरफटका . एकाच जागी बसून कंटाळलो म्हणून कुठतरी जाऊन येतो ते असतं पाय मोकळे करणे. पंढरपूरची ती वारी, शाळेची सहल. उन्हाळ्याच्या किंवा दिवाळीच्या सुट्टीत मित्रांसोबतीने निरर्थकपणे फिरणं म्हणजे भटकणं. या सगळ्या प्रकारच्या प्रवासाचे,फिरण्याचे प्रकार वेगवेगळे, तरी ते आनंद देणारे, कंटाळा घालवणारे, मनाची मरगळ दूर करणारे असतात. का ते कायम भटक्या कुत्र्यासारखा फिरत असतो किंवा ही बया कायम दुसऱ्यांच्या घरी बेल घालत फिरत असते असं म्हणून भटकण्याला कोणी कितीही चिडवो अथवा नावे ठेवो ; स्वैरपणे, फारसं काटेकोर नियोजन नसताना, निव्वळ आनंदासाठी फिरण्याचा, भटकंती करण्याचा नूर काही औरच असतो. चलो बॅग भरो, निकल पडो असं कोणी म्हणण्याच्याही आधीपासून माणूस भटकंती करतोच आहे. केल्याने देशाटन वगैरे कळण्याच्या आधी ही. निसर्गाची नैसार्गिक बदलणारी रुपं पाहायला माणसाला आवडतातच, त्या बरोबरीने माणसानेच निर्माण केलेल्या कित्येक गोष्टी ही त्याला भुरळ घालतात. उंचावरून वेगाने जमिनीकडे झेपावणारे फेसाळ धबधबे, वाहत्या नद्या, त्यावरची धरणं, त्यांचे संगम, धार्मिक महत्व असणारी तीर्थक्षेत्रं, समुद्र, समुद्रकिनारे, डोंगर-पर्वतरांगा, उंच शिखरं, थंड हवेची ठिकाणं, लेणी-गुंफा, गड किल्ले, राजवाडे, स्मारक, वस्तुसंग्रहालय, अभयारण्ये, प्राणी संग्रहालये, तलाव सरोवरे, पुतळे, कारंजे, अम्युझमेंट पार्क अशा असंख्य ठिकाणी जायला, तिथला अनुभव घ्यायला त्याला आवडतं. फक्त ठिकाणच नाही तर प्रवासातला अनुभव, वाहनांमधील अनुभवही, नाविन्याची वेगळीच अनुभूति देणारा असतो. मग लेह लडाखची बाईक राईड असो किंवा केरळची हाऊस बोट मधील सफर. आज अशी सफर घडवणाऱ्या, पर्यटनस्थळी घेऊन जाणाऱ्या प्रवासी संस्था किंवा ट्रॅव्हल एजन्सीज मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. कोव्हिड काळानंतर पर्यटकांच्या संख्येत ही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. अशा पर्यटन संस्थांचे आखीव-रेखीव नियोजन असते. दिवसाचे वेळापत्रक, पाहण्याची ठराविक ठिकाणे ठरलेली असतात. इथं पर्यंत आलोच आहोत तर इथलं सर्वच्या सर्व उपलब्ध असेल त्या वेळेत अधाश्यासारखं पाहत, तिथले फोटो काढ आणि ठेव स्टेटसवर असं चालू असतं.किती कृत्रिम वाटते हे? रेल्वे स्टेशनवर वाजणाऱ्या रेकॉर्डेड टेप सारखं. समोरा समोर बसल्यावर होणाऱ्या संभाषणा सारखा ताजेपणा हरवल्यासारखं. उत्स्फूर्तपणे केली जाणारी भटकंती वेगळीच शांतता देते, त्यातलं समाधान, आनंद वेगळाच असतो. ही भटकंती प्रवासात सोबत असणाऱ्या प्रियजनांसोबतच्या नात्यांचे बंध घट्ट करणारी असते. स्वतःच स्वतःला वेगळ्या रुपात भेटल्याचा आनंद ही त्यात असतो.

**सफर भी खूबसूरत,**
**हमसफर भी**
**रास्ता ही नहीं मंजिल भी**
**खूबसूरत से भी खूबसूरत है**
**असं म्हणतात ते उगीच नाही**



तरल सरल
माझ्या मनातलं



सौ.श्रीया निलेश पंडित
निपाणी.
मो.९६६५०६५७०८

# महात्मा गांधी:वन मॅन आर्मी

महात्मा गांधींचे नाव घेतले की, आपल्या डोळ्यांसमोर हातात काठी घेतलेला, पंचा नेसलेला, कृश देहयष्टीचा आणि चेहऱ्यावर विलक्षण शांत हास्य असलेला एक माणूस उभा राहतो. त्यांच्याकडे ना बंदूक होती, ना सैन्यदल; ना सत्ता होती, ना राज्ययंत्रणा. तरीही विसाव्या शतकातील सर्वांत शक्तिशाली साम्राज्याला आव्हान देणाऱ्या या माणसाला इतिहासाने असामान्य नैतिक शक्तीचा नेता म्हणून स्थान दिले. म्हणूनच महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले, तर त्यांना तत्कालीन व्यवस्थेत 'वन मॅन आर्मी' असे म्हणण्यामागचा अर्थ लक्षात येतो. २ ऑक्टोबर गांधी जयंतीला या महामानवाला अभिवादन करताना निद्रिस्त देशाला त्याच्या हक्काची जाणीव निर्माण करून संघर्ष करायला उभे करणाऱ्या या चेतनापुरुषापुढे प्रत्येक भारतीयाने आदराने नतमस्तक होणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मात्र येथे 'वन मॅन आर्मी' म्हणजे शस्त्र हातात घेऊन लढणारा एकटा सैनिक नव्हे. उलट, शस्त्राशिवाय हजारो निराधार, निःशस्त्र, गरीब लोकांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करणारा महापुरुष म्हणजे महात्मा गांधी. ज्यांचा कुणी नेता नाही, ज्यांच्या अन्यायाला वाचा नाही, ज्यांच्याकडे कोणतेही साधन-साहित्य-सामग्री नाही, अशा समुदायाला संघर्ष करण्याची शक्ती निर्माण करणारा एक माणूस, असा त्याचा अर्थ आहे. कारण गांधीजींची सेना होती सत्याची; त्यांचे शस्त्र होते अहिंसा; त्यांची ढाल होती करुणा,त्यांची ताकद होती संयम आणि त्यांचे सर्वांत मोठे सामर्थ्य होते माणसाच्या अंतःकरणावरील विश्वास. या एका महामानवाने अत्यंत विदारक परिस्थितीमध्ये सर्व जाती धर्म गुण्यागोविंदाने नांदतील अशा भारताची स्वप्ने बघितली होती. नव्हे त्याची बीजे स्वतःच्या जीवनशैलीतून पेरली होती. आज भारत त्यांनी पेरलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर उभा राहिला आहे. एका माणसाने आपल्या समर्थकांच्या, अनुयायांच्या हजारो हातांनी हा देश उभा केला. म्हणून गांधी वन मॅन आर्मी आहेत.

### 'गांधींना महात्मा' ही उपाधी कोणी दिली

रवींद्रनाथ टागोर यांनी १९१५ मध्ये 'गांधींना महात्मा' म्हटले. गांधी स्मृतीच्या माहितीनुसार नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४ जून १९४४ रोजी आझाद हिंद रेडिओवरून गांधींना 'Father of the Nation' म्हणून संबोधले. राष्ट्रपिता म्हटले. परंतु 'One-Man Boundary Force' हा उल्लेख या लेखाच्या शीर्षकाशी अधिक जवळचा आहे. भारताच्या फाळणीच्या काळात एकीकडे पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात असूनही हिंसा सुरू होती. त्याच वेळी दुसरीकडे गांधीजी कलकत्त्यात हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी काम करीत होते. २६ ऑगस्ट १९४७ रोजी लॉर्ड माउंटबॅटन यांनी गांधीजींना लिहिलेल्या



पत्रात पंजाबमधील ५५ हजार सैनिकांचा संदर्भ देत बंगालमध्ये one-man' अशी एक आपली शक्ती असल्याचे नमूद केले. त्यांचा इशारा गांधीजींकडे होता. त्यांच्या बंगाल प्रांतातील एकट्या लढ्याकडे होता. गांधीजींना One-Man Boundary Force म्हणून त्यांनी त्या विदारक परिस्थितीत आदरांजली अर्पण केली. त्यामुळे ही उपमा का महत्त्वाची आहे, हे कलकत्त्याच्या घटनांमधून समजते.

१९४७ च्या ऑगस्टमध्ये कलकत्ता सांप्रदायिक हिंसेच्या छायेत होता. गांधीजींनी सुरक्षित जागा शोधण्याऐवजी हिंसाग्रस्त भागात जाण्याचा निर्णय घेतला. १३ ऑगस्टला ते हुसैन शहीद सुहरावर्दी यांच्यासह बेलियाघाटा येथील हैदरी मॅन्शनमध्ये राहायला गेले. हा परिसर त्या वेळी तणावग्रस्त होता. गांधींच्या प्रार्थना, संवाद आणि प्रत्यक्ष लोकांमध्ये जाण्याच्या प्रयत्नांचा तेथील हिंसेवर परिणाम झाला. 'गांधी हेरिटेज पोर्टल' या कालखंडाला कलकत्त्यातील 'Miracle of Calcutta' म्हणून नोंदवते. इथे गांधीजींच्या 'वन मॅन आर्मी'चे खरे स्वरूप दिसते. त्यांनी सैन्य उभे केले नाही; त्यांनी माणसाच्या विवेकाला जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विरोधकाला शत्रू मानले नाही. त्याच्या अंतःकरणाला आवाहन केले. त्यामुळे त्यांचा संघर्ष केवळ राजकीय नव्हता; तो माणसाच्या मनावर चालणारा संघर्ष होता.

### दक्षिण आफ्रिकेतील पाळेमुळे

या शक्तीची मुळे दक्षिण आफ्रिकेत सापडतात. १८९३ मध्ये पीटरमार्टिझबर्ग येथे वैध तिकीट असूनही वर्णभेदामुळे गांधींना रेल्वेच्या डब्यातून बाहेर फेकण्यात आले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवरील भेदभावाविरुद्ध त्यांनी संघर्ष उभारला. याच काळात सत्याग्रहाची संकल्पना आकाराला आली. सत्याग्रह म्हणजे केवळ सरकारविरुद्ध आंदोलन नव्हते. गांधींच्या दृष्टीने सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह आणि अन्यायाविरुद्ध अहिंसक प्रतिकार. त्यामध्ये विरोधकाचा विनाश नव्हता; त्याच्या विवेकाला जागवण्याचा प्रयत्न होता. म्हणूनच गांधींची अहिंसा ही निष्क्रियता नव्हती. ती कृतीची, धैर्याची आणि आत्मसंयमाची पद्धत होती.

### दांडी मार्च प्रभावी उदाहरण

दांडी मार्च हा त्याचा अत्यंत प्रभावी नमुना. १२ मार्च १९३० रोजी गांधी ७९ सहकाऱ्यांसह साबरमतीहून दांडीकडे निघाले. ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीने क्षुल्लक वाटणाऱ्या मिठाच्या कायद्याला त्यांनी साम्राज्यविरोधी जनआंदोलनाचे प्रतीक बनवले. पुढे हजारो लोक या आंदोलनात सहभागी झाले. दांडी मार्चने सत्य आणि अहिंसेच्या नैतिक शक्तीला व्यापक जनशक्तीत रूपांतरित केले. म्हणूनच 'गांधीजींची सेना' ही संख्येची नव्हती; ती विश्वासाची होती. त्यांच्या एका आवाहनाने सामान्य माणूस मिठाचा कायदा मोडण्यासाठी समुद्राकडे निघाला. त्यांच्या एका आवाहनाने परदेशी वस्त्रांचा त्याग झाला. त्यांच्या एका आवाहनाने लाखो लोक स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी झाले. त्यांनी रायफल किंवा मशीनगनच्या शक्तीऐवजी सामान्य माणसामध्ये असलेल्या नैतिक शक्तीला जागृत केले. याच कारणामुळे गांधीजींचा प्रभाव भारताच्या सीमा ओलांडून गेला.

### जगभरात गांधीजींचे अनुयायी

जगामध्ये सर्वाधिक पुतळे विविध देशांत असणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीचे नेते मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर, दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला आणि इतर अनेक नेत्यांवर गांधींच्या विचारांचा प्रभाव पडला. राष्ट्रपतींच्या संदेशातही गांधींच्या विचारांनी किंग, मंडेला आणि इतर जागतिक नेत्यांना प्रभावित केल्याचे नमूद आहे. गोलमेज परिषदेला जेव्हा गांधीजी लंडनला गेले त्यावेळी ब्रिटनमधील नागरिक त्यांना बघायला रस्त्यांवर गर्दी करत. प्रचार-प्रसाराचा तो काळ नव्हता. आपल्या विरोधकांच्या मनामध्ये देखील त्यांनी या देशाबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचे काम आपल्या वर्तनातून केले.अल्बर्ट आइनस्टाइन यांनी गांधींबद्दल केलेले प्रसिद्ध विधानही त्यांच्या जागतिक प्रभावाचे द्योतक आहे. अशा प्रकारचा माणूस प्रत्यक्ष रक्तामांसात या पृथ्वीवर चालत होता, यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणे कठीण जाईल. गांधींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे करुणा. त्यांच्यासाठी अहिंसा केवळ राजकीय तंत्र नव्हते. ती जीवनपद्धती होती. शब्दांतही हिंसा नको, विचारांतही हिंसा नको, विरोधकाबद्दलही द्वेष नको-अशी त्यांची भूमिका होती. विरोधकांमधल्या गुणवानांचीही कदर कशी करावी हे गांधींनी आपल्या पूर्ण आयुष्यात दाखवून दिले. त्यामुळे त्यांचे पक्के विरोधकही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात असायचे.

### बिकट परिस्थितीला सामोरे जाणारे व्यक्तिमत्त्व

नोआखली असो, बिहार असो किंवा कलकत्ता-गांधी हिंसेच्या केंद्रात गेले. १९४६-४७ च्या सांप्रदायिक हिंसेच्या काळात ते लोकांमध्ये राहिले, पायी फिरले, प्रार्थना केली, संवाद साधला आणि गरज पडली तेव्हा उपोषण केले. नोआखलीत त्यांचा पदयात्रेचा कालखंड हा त्यांच्या अहिंसक शांतता-प्रयत्नांचा महत्त्वाचा अध्याय आहे. याच ठिकाणी 'वन मॅन आर्मी' या शब्दाचा खरा अर्थ स्पष्ट होतो. जगात युद्धे जिंकण्यासाठी सैन्य असतात; पण माणसांच्या मनातील द्वेषावर विजय मिळवण्यासाठी कोणते सैन्य असते? गांधीजींनी या प्रश्नाचे उत्तर आपल्या आचरणातून दिले. त्यांनी सांगितले की शत्रूला पराभूत करण्यापेक्षा त्याच्या मनातील शत्रुत्व बदलणे अधिक मोठा विजय आहे. आज जग पुन्हा हिंसा, युद्ध, द्वेष आणि असहिष्णुतेच्या प्रश्नांशी झुंजत आहे. अशा वेळी गांधीजींचे महत्त्व केवळ इतिहासातील एका स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यापुरते मर्यादित राहत नाही. त्यांची पद्धत आपल्याला वेगळा प्रश्न विचारते-शस्त्रांनी शांतता निर्माण करता येते का, की शांततेसाठी माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणारी नैतिक शक्ती आवश्यक असते? गांधींचे उत्तर स्पष्ट होते. त्यांनी १९२० मध्ये Young India मध्ये अहिंसेला मानवजातीच्या सर्वांत मोठ्या शक्तींपैकी एक मानले. त्यांच्या दृष्टीने अहिंसा म्हणजे दुर्बलतेचा स्वीकार नव्हता; ती अन्यायाला न झुकता, अन्याय करणाऱ्याविषयीही द्वेष न बाळगता लढण्याची शक्ती होती.म्हणूनच महात्मा गांधींना 'वन मॅन आर्मी' म्हणणे ही शस्त्रबळाची उपमा नाही; ती नैतिक शक्तीची उपमा आहे. एका माणसाने स्वतःभोवती बंदुका जमवल्या नाहीत; त्यांनी माणसे जोडली. त्यांनी सैन्य उभे केले नाही; त्यांनी समाजाच्या विवेकाला जागे केले. त्यांनी हिंसेला हिंसेने उत्तर दिले नाही; त्यांनी सत्य, अहिंसा आणि करुणेला संघर्षाचे सामर्थ्य बनवले. म्हणूनच माउंटबॅटन यांनी कलकत्त्यातील त्या विलक्षण परिस्थितीत गांधींना One-Man Boundary Force' म्हटले, ही घटना गांधींच्या जीवनातील केवळ एक प्रशंसात्मक नोंद नाही. ती त्यांच्या नेतृत्वाच्या एका अद्वितीय स्वरूपाची ऐतिहासिक साक्ष आहे. गांधींची सेना माणसांची होती; तिचे शस्त्र सत्य होते, तिची शक्ती अहिंसा होती आणि तिचे अंतिम ध्येय माणुसकी होते. म्हणूनच गांधी केवळ अहिंसेचे पूजारी नव्हते; ते अहिंसेला संघर्षाची शक्ती बनवणारे 'वन मॅन आर्मी' होते.

-प्रवीण टाके
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
मो.नं.९७०२८५८७७७

## पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी जिल्ह्यात ५० परीक्षा केंद्र निश्चित

छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:

---------------------------

पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा सुरळीत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्ह्यात तालुकानिहाय एकूण ५० परीक्षाकेंद्र निश्चित करण्यात आले आहेत. संबंधित परीक्षार्थींनी त्यांना नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर निर्धारित वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.तालुकानिहाय निश्चित करण्यात आलेली परीक्षा केंद्रे पुढीलप्रमाणे आहेत.

छत्रपती संभाजीनगर तालुका- ११ केंद्र शिशुविहार हायस्कूल, औरंगपुरा; शिशुविहार हायस्कूल, औरंगपुरा; लिटल फ्लॉवर हायस्कूल, कॅन्टोन्मेंट; उज्वलाताई पवार इंग्लिश हायस्कूल, सातारा परिसर; चाटे इंग्लिश स्कूल, सातारा परिसर; सेंट फ्रान्सिस हायस्कूल, जालना रोड; वुडरिज हायस्कूल, कांचनवाडी; होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी; एंजल किड्स इंटरनॅशनल स्कूल, सातारा परिसर; होली क्रॉस मराठी हायस्कूल, छावणी,मॉंटेसरी बालक मंदिर औरंगपुरा, आणि गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर, औरंगपुरा.खुलताबाद तालुका - २ केंद्र वेरूळ येथील परीक्षा केंद्र आणि संत जनार्दन स्वामी विद्यालय, वेरूळ. कन्नड तालुका - ८ केंद्र साने गुरुजी विद्यालय, कन्नड; आजूबाई विद्यालय, कन्नड; कै. काकासाहेब देशमुख विद्यालय, कन्नड; सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, कन्नड; न्यू हायस्कूल, कन्नड; अजितदादा पवार उर्दू सेकंडरी विद्यालय, कन्नड; कै. झेलूबाई शंकरराव पाटील गायकवाड प्राथमिक शाळा, कन्नड आणि माणिकराव पालोदकर विद्यालय, कन्नड.सोयगाव तालुका-१ केंद्र :जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, फर्दापूर. सिल्लोड तालुका- ७ केंद्र :छत्रपती शिवाजी विद्यालय, सिल्लोड; नॅशनल उर्दू हायस्कूल, भोकरदन रोड; नॅशनल मराठी स्कूल, जयभवानी नगर; रामकृष्ण हायस्कूल, सिल्लोड; नगर परिषद हायस्कूल, सिल्लोड; संत एकनाथ माध्यमिक विद्यालय, भराडी रोड आणि स्वामी विवेकानंद विद्यालय, जळगाव रोड.पैठण तालुका - ७ केंद्र :जिल्हा परिषद कन्या प्रशाला, पैठण; श्रीनाथ हायस्कूल, पैठण; मिश्रीलाल पहाडे जैन इंग्लिश स्कूल, पैठण; आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण; आर्य चाणक्य माध्यमिक विद्यामंदिर, पैठण; कौशल्या विद्यामंदिर, पाटेगाव आणि आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल, पैठण.गंगापूर तालुका - ६ केंद्र :न्यू हायस्कूल, गंगापूर; राजा शिवाजी हायस्कूल, बजाजनगर; गजानन विद्या मंदिर, रांजणगाव (शेणपुंजी); ऑर्किड टेक्नो स्कूल, सिडको महानगर-१, बजाजनगर; देवगिरी ग्लोबल अकॅडमी, गंगापूर आणि श्रीमती आर. एम. धूत कन्या प्रशाला, गंगापूर.

वैजापूर तालुका - ५ केंद्र : सेंट मोनिका इंग्लिश स्कूल, रेल्वे स्टेशन रोड; करुणा निकेतन प्राथमिक शाळा, रेल्वे स्टेशन रोड; हलका-ए-दावा नाईक गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, रेल्वे स्टेशन रोड; कैलास पाटील माध्यमिक विद्यालय, येवला रोड आणि न्यू हायस्कूल, फुलेवाडी रोड.फुलंब्री तालुका - ३ केंद्र :संत सावळा गुरुकुल विद्यालय, सिल्लोड रोड; शांतिनिकेतन विद्यालय, खुलताबाद रोड आणि श्री गोरक्ष विद्यालय, खामगाव.छत्रपती संभाजीनगर ११, खुलताबाद २, कन्नड ८, सोयगाव १, सिल्लोड ७, पैठण ७, गंगापूर ६, वैजापूर ५ आणि फुलंब्री ३ अशी एकूण ५० परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.परीक्षार्थी व पालकांनी प्रवेशपत्रावरील परीक्षा केंद्राचे नाव व पत्ता काळजीपूर्वक तपासावा. परीक्षेच्या दिवशी परीक्षार्थींनी आवश्यक कागदपत्रांसह निर्धारित वेळेपूर्वी संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे तसेच परीक्षा प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**दैनिक सह्याद्री टाइम्स**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
OLD NAME
1) शेख मिनाज शब्बीर
2) SHAIKH MINAJ SHABBIR
TO
NEW NAME
**MINAZ SHABBIR SHAIKH**
AS PER MY DOCUMENTS
ADD: AT. RANJANGAON DANDGA POST. PACHOD
TQ. PAITHAN DIST AURANGABAD PIN.431121

**दैनिक सह्याद्री टाइम्स**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
OLD NAME
1) MASHAYAKH SYED SAIMA TABBASSUM SHAMSUDDIN
2) SYED MASHAYAKH SAIMA TABASSUM SHAMSUDDIN
TO
NEW NAME
**MASHAYAKH SYED SAIMA TABASSUM SHAMSUDDIN**
AS PER MY DOCUMENTS
ADD: SHAIKH WADA, NEKNOOR,
YELLAMBGHAT, BEED-431125

# उत्तमचंद ठोले जैन छात्रालयात पर्युषण पर्व सांगता

**छत्रपती सभाजीनगर,प्रतिनिधी:**चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, कचनेर संचलित उत्तमचंद ठोले जैन छात्रालयात पर्युषण पर्वानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पर्युषण पर्वाच्या पावन पर्वकाळात छात्रालयात दररोज भक्तिभावाने पंचामृत अभिषेक, पूजन व शांतिमंत्राचे पठण करण्यात येत आहे.जैन धर्मातील पर्युषण पर्व हे आत्मशुद्धी, संयम, त्याग, तपश्चर्या आणि आत्मचिंतनाचा संदेश देणारे महत्त्वपूर्ण पर्व आहे. या पर्वाचे औचित्य साधून छात्रालयातील विद्यार्थ्यांना धार्मिक संस्कारांची ओळख व्हावी, त्यांच्यामध्ये नैतिक मूल्यांची रुजवण व्हावी आणि धर्माविषयी आस्था निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.दररोज सकाळी पंचामृत अभिषेक व शांतिमंत्राच्या पठणाने धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होत असून, यामध्ये छात्रालयातील विद्यार्थी उत्साहाने सहभागी होत आहेत. भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या धार्मिक उपक्रमांमुळे छात्रालय परिसरात आध्यात्मिक चैतन्य निर्माण झाले आहे.



मांजरी-माहुली शिवारात नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करताना तहसीलदार नवनाथ वगवाड, ग्राम महसूल अधिकारी अमोल काळे व स्नेहा कथलकर (छायाचित्र:अमिन पटेल,गंगापूर)

**पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम उद्ध्वस्त**

# तहसीलदार थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

**गंगापूर प्रतिनिधी:**

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने गंगापूर तालुक्यातील शेतकरी संकटात सापडला आहे.मका,कापूस,सोयाबीन,तूर आणि बाजरी यांसारखी पिके पाण्याअभावी वाळून गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.सर्वच मंडळातील पिकांची अवस्था अत्यंत बिकट असून, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासकीय यंत्रणा सक्रिय झाली असून, गुरुवारी तहसीलदार नवनाथ वगवाड यांच्यासह महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी थेट शेतशिवारात जाऊन परिस्थितीची पाहणी केली.मांजरी,माहुली यांसह तालुक्यातील विविध गावांच्या शिवारात अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याच्या कामाला युद्धपातळीवर सुरुवात करण्यात आली आहे.यावेळी तहसीलदार नवनाथ वगवाड,ग्राम महसूल अधिकारी मांजरी अमोल काळे,ग्राम महसूल अधिकारी माहुली स्नेहा कथलकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे केले.प्रशासनाकडून



पावसाअभावी नुकसान झालेल्या पिकांची ई-पिक पाहणी शेतकऱ्यांनी तातडीने करून घ्यावी. ई-पिक पाहणीची नोंद नुकसान भरपाईच्या प्रक्रियेसाठी महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची अचूक नोंद करून प्रशासनास सहकार्य करावे. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे काम सुरू असून, पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

**नवनाथ वगवाड:** तहसीलदार गंगापुर

प्रत्यक्ष पाहणी सुरू झाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची अपेक्षा निर्माण झाली आहे.यावेळी शेतकरी मच्छिंद्रनाथ ठोंबरे,भगवान सुंब,रमेश जाधव,भगचंद मतकर,गोपीचंद उडमळे,पोलीस पाटील कैलास घोडके, शिवाजी लांडे, दीपक लांडे,देविदास रत्नपारखे,सुनील जाधव,चंद्रकांत लांडे,देविदास कान्हू लांडे यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते.

# आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समिती

**नवी दिल्ली,प्रतिनिधी:**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने दिल्ली पोलिसांच्या आयटीएमएस प्रकल्पाच्या अंमलबजावणीला मंजुरी दिली आहे. करांसह अंदाजे १,७८९.५२ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पात ४२ प्रमुख वाहतूक कॉरिडॉर्सचा समावेश असेल. पुढील २४ महिन्यांत तीन टप्प्यांत हा प्रकल्प राबवला जाणार असून, त्यानंतर पाच वर्षासाठी त्याचे संचालन आणि देखभाल केली जाईल. केंद्र सरकार आणि दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र सरकारच्या वतीने राष्ट्रीय राजधानीतील वाहतूक व्यवस्थापन, वाहतूक पायाभूत सुविधा आणि शहरी गतिशीलता सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्न केले जात आहेत.

# भेंडाळा आरोग्य केंद्रातच कर्मचारी गैरहजर

**रुग्णसेवेचा बोजवारा,जि.प.सदस्या वैजयंती शिरसाठांनी धरले धारेवर!**




**गंगापूर, प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याचा आधार असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र भेंडाळ्यातच कर्मचारी गैरहजर असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. गुरुवार, दि.१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.१५ वाजता जिल्हा परिषद सदस्या सौ.वैजयंती वाल्मिक शिरसाठ यांनी आरोग्य केंद्राला अचानक भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी उपस्थिती तपासली असता अनेक कर्मचारी कर्तव्यावर नसल्याचे निदर्शनास आले.



भेट पुस्तिकेत करण्यात आलेल्या नोंदीनुसार, वैद्यकीय अधिकारी डॉ. रोशनी चव्हाण उपस्थित होत्या; मात्र नऊ

### पाहणीदरम्यान धक्कादायक वास्तव समोर गैरहजर कर्मचाऱ्यांवर कारवाई व वेतन कपातीची मागणी

कर्मचाऱ्यांपैकी केवळ दोन कर्मचारी उपस्थित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकारी पठाण हे मुख्यालयात उपस्थित नसल्याची नोंद करण्यात आली. श्रीमती ज्योत्सना शेळके या रजेवर असल्याचेही नमूद आहे.आरोग्य केंद्रातच कर्मचारी गायब, मग रुग्णांनी उपचारासाठी कुठे जायचे?,असा सवाल या प्रकारामुळे उपस्थित होत आहे. ग्रामीण भागातील रुग्ण, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आपत्कालीन उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना वेळेत सेवा मिळणे अपेक्षित असताना कर्मचारी गैरहजर राहणे ही बाब गंभीर मानली जात आहे.गैरहजर कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीची कारणे तपासून संबंधित नियमांनुसार कठोर कारवाई करावी तसेच अनधिकृत अनुपस्थिती असल्यास वेतनकपातीची प्रक्रिया करावी, अशी मागणी जि.प. सदस्या वैजयंती शिरसाठ यांनी भेट पुस्तिकेत केली आहे. या प्रकाराची वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन भेंडाळा आरोग्य केंद्रातील उपस्थिती व सेवा व्यवस्थेची तपासणी करावी,अशी मागणी होत आहे.




**महात्मा गांधी जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या विचारांना उजाळा देत शांतता, अहिंसा आणि मानवतेचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी गांधीजींसह विविध शांततादूतांच्या प्रतिमा हातात घेत जनजागृती केली. तसेच देशभक्तीपर व प्रेरणादायी गीतांचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमातून युद्ध नको, बुद्ध हवा आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.(छायाचित्र:जीवन वैष्णव)**

# रब्बी पिकांच्या आधारभूत किमतीत मोठी वाढ

**नवी दिल्ली,प्रतिनिधी:**शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला लाभदायक भाव मिळावा आणि रब्बी हंगामातील पिकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी केंद्र सरकारने विपणन हंगाम २०२७-२८ साठी सर्व अधिदेशित रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार विषयक समितीच्या बैठकीत या वाढीस मंजुरी देण्यात आली.यामध्ये करडईच्या एमएसपीमध्ये सर्वाधिक ६७५ रुपये प्रति क्विंटल, तर रॅपसीड व मोहरीच्या एमएसपीमध्ये ४१३ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. मसूरच्या एमएसपीमध्ये ३९० रुपये, ज्वारी एमएसपीमध्ये १३६ रुपये, हरभऱ्याच्या एमएसपीमध्ये ८३ रुपये आणि गव्हाच्या एमएसपीमध्ये २५ रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे.

विपणन हंगाम २०२७-२८ साठी सुधारित एमएसपीनुसार गव्हाला २,६१० रुपये, ज्वारी २,२८६ रुपये.

# तेजस्विनी लोकसंचालित साधन केंद्राची १७ वी वार्षिक सभा उत्साहात

**महिला उद्योजकता, उद्योग-व्यवसाय व शेतकरी प्रमाणपत्राबाबत मान्यवरांचे मार्गदर्शन**



**गंगापूर प्रतिनिधी:**महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), छत्रपती संभाजीनगर अंतर्गत स्थापित तेजस्विनी लोकसंचालित साधन केंद्र, गंगापूरची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी दिपाली लॉन्स, गंगापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी महिला बचत गटांच्या सदस्यांसह सीएमआरसी कर्मचारी व आरपी ताईंची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सभेसाठी उपविभागीय अधिकारी जान्हवी शेखर, जिल्हा समन्वय अधिकारी चंदनसिंग राठोड,पोलीस उपनिरीक्षक विनायक पाटील,नगराध्यक्ष संजय जाधव,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी,आयसी आयसीआय बँकेचे रिलेशनशिप मॅनेजर दत्तात्रय राजपूत,कृषी अधिकारी बापूराव जायभाय, नगरसेविका सुवर्णा जाधव तसेच आरोग्य विभागाचे प्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती.सीएमआरसी व्यवस्थापक सुनीता सहाने यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते संस्थेचा १७ वा वार्षिक अहवाल प्रकाशित करण्यात आला.

उपविभागीय अधिकारी जान्हवी शेखर यांनी महिलांना उद्योग,व्यवसाय तसेच महिला सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. भविष्यात तेजस्विनी लोकसंचालित साधन केंद्राच्या माध्यमातून संयुक्त सामाजिक उपक्रम राबविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी आवश्यक ऑनलाइन प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वय अधिकारी चंदनसिंग राठोड यांनी महिलांना उद्योग-व्यवसायाच्या संधी, मायक्रो एंटरप्राइज कर्ज व विविध सब प्रोजेक्ट्स याबाबत माहिती देत शुभेच्छा दिल्या.संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा उदे, सचिव नंदा ठोंबरे,उपाध्यक्ष देवकी उचित व कोषाध्यक्ष जाणकाबाई जाधव यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांची उपस्थिती होती.सभेच्या यशस्वी आयोजनासाठी लेखापाल विशाल टाके, सहयोगिनी विजया कसाने, नसरीन पठाण, प्रमिला कांबळे व मनीषा दारुंटे यांनी विशेष परिश्रम घेतले. महिला सक्षमीकरण, उद्योजकता आणि स्वावलंबनाचा संदेश देत सभा उत्साहात संपन्न झाली.

# गांधीजींचे अपरिग्रह व्रत...

२ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती! मला त्यांचं एक वाक्य मनामध्ये घर करून बसलेले आहे ते म्हणजे की मला तुम्ही मारू शकतात पण माझ्या विचाराला नाही एवढे निर्भय, व्रताशी आणि तत्त्वाशी कधीही तडजोड न करणार महान नेता अर्थात महान पुरुष जगामध्ये दुसरा कोणताही पाहिला नाही आजही महात्मा गांधीजी त्यांच्या विचाराने जिवंत आहेत. कारण त्यांचे विचार जगभरातील अनेक विचारवंतांनी व देशाने स्वीकारल्यामुळे त्या देशांमध्ये प्रगती आणि मानवी विकास झालेला दिसतो. अर्थ विषमतेला आणि बेलगाम अर्थप्राप्तीला आळा घालायचा असेल तर महात्मा गांधीजींच्या अकरा वर्णातील अपरिग्रह हे हे तत्व अर्थात व्रत सर्वात जास्त मला भावते त्याचबरोबर त्याला साथ दिलेली आहे दुसरे व्रत अस्तेय .ते तेवढेच महत्त्वाचे आहे . अस्तेय म्हणजे दुसऱ्याच्या मालकीची वस्तू व पैसा याची चोरी न करणे होय त्याचबरोबर शरीरक्षमते पेक्षा जास्त पैसा कमावणे आणि बेहिशोबि नफा, व्याज, दलाली करणे म्हणजे सुद्धा त्यातच येते . हे दोन्ही सत्य जीवनाच्या बाजू आहेत. त्याचबरोबर जीवन जगण्याच्या दोन बाजू म्हटल्या तरी चालतील. अपरिग्रह म्हणजे संग्रह साठा भोगवादी वृत्ती व लालसे तून निर्माण मुक्ती करणं.अर्थात अर्थात आळा घालने. आपणास महिन्यातला लागत असलेला किराणातील गूळ दोन किलो असेल आणि प्रत्येक वेळी आपण साठवून ठेवत असलेला दहा किलो गूळ म्हणजे परिग्रह होय. आवश्यक नसलेल्या वस्तूचा आणि पैशाचा संग्रह करणे हे गांधीजी पाप मानत. श्रीमंती व मोठेपणाचे प्रदर्शन करण्यासाठी वस्तूची साठा करणे. त्याचबरोबर एखाद्या वस्तूची साठवणूक अमर्याद होत गेली तर यामुळे उत्पादन व्यवस्थेवर ताण येतो. गरीब व गरजू लोकांना यापासून वंचित राहावे लागते.यातूनच भाववाढ/ महागाई निर्माण होते. प्रत्येकास समाज



व्यवस्थेतून योग्य अधिकार व उपभोग घेता येत नाही. एखादा वर्ग चैन करत जगतो! तर दुसरा वर्ग गरिबीत आणि दुःखात जगतो! अशी जेव्हा परिस्थिती उत्पन्न होते तेव्हा सामाजिक कलह वाढतात. हे देशहितास धोक्याचं आहे. महात्मा गांधीजींचा अपरिग्रह विषयी एक मुख्य सूत्र आहे ते म्हणजे गरजेपेक्षा घेणं व वापरणं हव्यासापोटी सोडून देणे याविषयी त्यांनी सांगितले आहे.कि The earth has enough resources for our need, but not for our greed.याचा अर्थ असा आहे की 'निसर्ग आपल्या गरजा पुरु शकतो पण माणसाची लालसा कधीही पुरु शकत नाही' अर्थात ती अमर्यादा असल्यामुळे निसर्ग सुद्धा यापुढे हतबल होईल.परिग्रही वृत्ती म्हणजे साठा करून ठेवते त्याच्या उलट अपरिग्रह म्हणजे गरजेपेक्षा जास्त न ठेवणे जास्त न वापरणे अपरिग्रहाची सुरुवात महात्मा गांधीजी यांनी स्वतः पासून केली त्यांच्या अंगावर एक धोतर/ पंचा/ तर वापरण्यासाठी वाटी आणि एक घड्याळ, काठी साधा चष्मा आहे. त्यांच्या जीवनशैलीस असणारे आवश्यक हेच साहित्य होते.अनेक उद्योगपती गांधीजींना सदर हाताने आर्थिक मदत करत होते.जमनालाल बजाज या उद्योगपतीने महात्मा गांधीजींच्या सहवासात आपले संपूर्ण आयुष्य घातले. त्याचबरोबर आपली संपत्ती महात्मा गांधीजींच्या कार्यासाठी अर्पित केली. वर्धा येथील आश्रम सुद्धा त्यांच्या जमिनीवर आहे. स्वदेशी चळवळीतील अनेक खादीच्या मील त्यांनी उभारले. दुसरे उद्योगपती घनश्याम दास बिर्ला हे गांधीजींचे खजिनदार होते. गांधीजींच्या ज्या ठिकाणी शेवट झाला शेवट झाला ते बिर्ला हाऊस घनश्याम यांच्याच मालकीचे होते. मिठाचा सत्याग्रह, सविनय कायदेभंग, अशी अनेक आंदोलने बिर्ला यांच्याच पैशातून उभी राहिली.ती मदत ट्रस्टीला देत असतात आपण फक्त तो पैसा व देणगी सांभाळणारे एक ट्रस्टी आहोत.अर्थात पैशाचा वापर वैयक्तिक स्वतःसाठी करणं म्हणजे गैर आहे. असे ते मानीत .माणूस कमावतो पण त्याची हाव संपत नाही पैशाविषयी गांधीजींनी सांगितले आहे की 'पैसा कमवा पण तो स्वच्छ मार्गाने व त्याचा हव्यास न ठेवता पण साठवणूक न करता पैसा फिरवत ठेवा! ' म्हणजे तो जनतेच्या देशाच्या विकासात हातभार लागेल.आपण कमावलेले काही हिस्सा गरजूंना व गरिबांना देत राहिला. तर जगात एकही माणूस उपाशी व बेकार राहणार नाही. यातूनच अर्थविषमता संपेल हाच मुख्य उद्देश गांधीजींच्या अपरिग्रह तत्वात होता.वैष्णव जन तो तेणे कहिये, जे पीड परायी जाणे रे पर दुःखे उपकार करे तोये, मन अभिमान न आणे ही गांधीजींना सगळ्यात आवडती प्रार्थना. नरसी मेहतांनी लिहिलेली आहे.याचा सार असा आहे की.. देवाचा माणूस तोच, जो दुसऱ्याचं दुःख समजून घेतो. दुसऱ्याला मदत करूनही गर्व करत नाही.

------------------

**-डॉ.डी.एस.काटे**
उद्योजक व अर्थविषयक अभ्यासाक

**» झुंजार छावाच्या पाठपुराव्याला यश**

# तीन वर्षांनंतर शेतकऱ्याला मिळाले १ लाख १३ हजार



शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांसाठी आवाज उठवणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत पाठपुरावा करणे हे आमचे कर्तव्य आहे.शेतकऱ्यांच्या कोणत्याही हक्कावर गदा आली तर झुंजार छावा संघटना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील.

**कृष्णा अर्जुन पाटील पऱ्हाड :** मराठवाडा अध्यक्ष,झुंजार छावा संघटना

**गंगापुर प्रतिनिधी:**
सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लासूर स्टेशन शाखेतील शेतकरी गोरखनाथ रामचंद्र राऊत (रा. बुट्टेवाडगाव) यांची तब्बल तीन वर्षांपासून अडकलेली १ लाख १३ हजार २०० रक्कम अखेर परत मिळाली असून, झुंजार छावा संघटनेच्या पाठपुराव्यामुळे शेतकऱ्याला न्याय मिळाला आहे.

गोरखनाथ राऊत यांनी १८ नोव्हेंबर २०२३ रोजी आपल्या बचत खात्यातील १ लाख १३ हजार २०० रक्कमेची मुदत ठेव (एफडी) केली होती. मात्र, ही रक्कम त्यांच्या पीककर्ज खात्यात वर्ग झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यानंतर त्यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया,लासूर स्टेशन शाखेचे शाखा व्यवस्थापक ऋषिकेश राजनेकर यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून आपली रक्कम परत मिळण्याची मागणी केली.

या प्रकरणाची माहिती मिळताच झुंजार छावा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष कृष्णा अर्जुन पाटील पऱ्हाड यांनी शेतकऱ्याच्या वतीने बँक प्रशासनाकडे ठामपणे पाठपुरावा केला. तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही हा विषय मांडून शेतकऱ्याच्या हक्काची रक्कम परत मिळण्यासाठी प्रयत्न केले.

संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत बँक प्रशासनाने प्रकरणाची तपासणी करून आवश्यक कार्यवाही केली. अखेर १ ऑक्टोबर २०२६ रोजी १ लाख १३ हजार २०० रक्कम गोरखनाथ राऊत यांना परत करण्यात आली. रक्कम प्राप्त झाल्याची लेखी पोहोचही शेतकऱ्याकडून घेण्यात आली.तब्बल तीन वर्षांनंतर आपली रक्कम परत मिळाल्याने गोरखनाथ राऊत यांनी बँक प्रशासन तसेच झुंजार छावा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष कृष्णा अर्जुन पाटील पऱ्हाड यांचे आभार मानले.

# नवोदय विद्यालयाच्या इयत्ता ९ वी व ११ वी प्रवेश परीक्षेसाठी अर्जाची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:**जवाहर नवोदय विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी इयत्ता ९ वी व ११ वीच्या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या लॅटरल एन्ट्री सिलेक्शन टेस्ट-२०२७ ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३० सप्टेंबर २०२६ होती.इयत्ता ९ वी व ११ वीची प्रवेश परीक्षा शनिवार, दि. १० एप्रिल २०२७ रोजी घेण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनीवाढीव मुदतीचा लाभ घेऊन ऑनलाइन अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. **इयत्ता ९ वी प्रवेशासाठी पात्रता:**विद्यार्थी संबंधित जिल्ह्याचा रहिवासी असावा. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता ८ वीमध्ये शिकत असावा. विद्यार्थ्याचा रहिवासी जिल्हा व इयत्ता ८ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या शाळेचा जिल्हा एकच असावा. विद्यार्थ्याची जन्मतारीख दि. १ मे २०१२ ते दि. ३१ जुलै २०१४ या कालावधीतील असावी. दोन्ही तारखांचा समावेश आहे. इयत्ता ११ वी प्रवेशासाठी पात्रता:विद्यार्थी संबंधित जिल्ह्याचा रहिवासी असावा. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता १० वीमध्ये शिकत असावा. यापूर्वी इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पात्र राहणार नाहीत. विद्यार्थ्याचा रहिवासी जिल्हा व इयत्ता १० वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या शाळेचा जिल्हा एकच असावा. विद्यार्थ्याची जन्मतारीख दि. १ जून २०१० तेदि. ३१ जुलै २०१२ या कालावधीतील असावी. दोन्ही तारखांचा समावेश आहे. इयत्ता ९ वी प्रवेशासाठीऑनलाइन अर्ज संकेतस्थळ (https://cbseitms.nic.in/2026/nvsix_9/?utm_source=chatgpt.com) तर इयत्ता १० वी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज संकेतस्थळ(https://cbseitms.nic.in/2026/nvsxi_11 /?utm_source=chatgpt.com) येथे अर्ज करता येईल. जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी आणि शासकीय व मान्यताप्राप्त शाळांच्या मुख्याध्यापकांनी प्रवेश परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना माहिती देऊन जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**अल्पदरात जाहिरात प्रसिद्ध केल्या जातील**

जाहिर प्रगटन,धर्मादाय आयुक्त जाहिरात, वाढदिवस,पासपोर्टसाठी चेंज ऑफ नेम, आदी जाहिरातीसाठी संपर्क साधावा.

जाहिरातीसाठी संपर्क
मो. 9545119917
7709193786

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई -निविदा सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई निविदा मागवण्यात येत आहे . टी -०५, ०६, ०७ व ०८ अनुक्रमे वैजापुर-१, वैजापुर-२, पिशोर, कन्नड उपविभागातील लघुदाब घरघुती व वाणिज्य मीटर रीडिंग वाचन महावितरण मोबाईल ऐपद्वारे, बिल प्रिंटींग व वाटप करण्याच्या कामाकरीता. निविदा विक्री कालावधी दि ०१.१०.२०२६ ते ०७.१०.२०२६. निविदा भरण्याची शेवटची तारीख दि .०७.१०.२०२६ रोजी ०३.०० वाजेपर्यंत. वरील निविदा कंपनीच्या www.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर भेट द्यावी.

PRO NO. 143 कार्यकारी अभियंता, महावितरण, कन्नड विभाग.

## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

E mail - sdmabad@gmail.com Landline No - 0240-2324100

जाक्र २०२६/संकीर्ण/जमृअ/सीआर-११२२/कावि-०३ दि.२९/०९/२०२६

### जाहीर प्रगटन

**अर्जदार:-श्री./श्रीमती.समीर खान शेर खान पठाण**
**रा.काचीवाडा चेलीपुरा छ.संभाजीनगर**

**विरूद्ध**

**गैरअर्जदार: उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर**

**विषय:- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज**

**संदर्भ:- श्री/श्रीमती.समीर खान शेर खान पठाण, रा.काचीवाडा चेलीपुरा छ.संभाजीनगर यांचा अर्ज दि.२२.०७.२०२६**

विषयाकींत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे **पठाण मिन्सा खान समीर खान** यांचा दिनांक ०७/०३/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती.**समीर खान शेर खान पठाण** यांचे मुलगी नामे, **पठाण मिन्सा खान समीर खान** यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्म मृत्यू-नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैधकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे सिया मुलगी नामे, **पठाण मिन्सा खान समीर खान** यांचा दिनांक ०७/०३/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२६ रोजी देण्यात आले आहे.**

**दिनांक: / /२०२६**
**ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.**

स्वाक्षरित/-
**उप विभागीय अधिकारी**
**तथा उपविभागीय दंडाधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर करीता**

---

### जाहीर प्रगटन

## खुलताबाद येथील श्री.ए.ए.पांडे साहेब सह दिवाणी न्यायाधीश साहेब, कस्तर खुलताबाद यांच्या न्यायालयात

एम.ए.आर.जे.आय.नं.१८५/२०२६ पु.ता.०७/११/२०२६

**अर्जदार :-**
**१) साहेबराव पि.माधवराव गायकवाड, वय ६३ वर्ष, धंदा:शेती,**
**रा.दरेगाव,ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद**
**२) संगीता भ्र.साहेबराव गायकवाड, वय ५२ वर्ष, धंदा:घरकाम**
**रा.वरील प्रमाणे.**

**विरूद्ध**

**गैरअर्जदार:-महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.**
**विषय:बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्या अर्थी, उपरोक्त अर्जदारांनी मा. न्यायालयात **ॲड.शरद व्ही भागडे पाटील** यांच्या मार्फत अर्ज केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ यांचा मुलगा नामे **दिनेश पि.साहेबराव गायकवाड** यांचा मृत्यू दिनांक २८/०२/२०२६ रोजी दरेगाव, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथे झालेला आहे. मयत **दिनेश पि.साहेबराव गायकवाड** यांचे अर्जदार क्र.१ हे वडिल असून अर्जदार क्र.२ ही आई आहे. मयत **दिनेश पि. साहेबराव गायकवाड** यांचे लग्न झालेले नव्हते. त्यामुळे त्यांना अर्जदार क्र.१ व २ यांच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहे. मयत **दिनेश पि.साहेबराव गायकवाड** यांच्या नावे होंडा कंपनीची सिबी यूनिकॉर्न दुचाकी वाहन ज्याचा नोंदणीकृत क्र. एमएच ४७-एए-५५६६, चेसिस क्र.एमई ४ केसी ३११ जेएच८१२२२३०, इंजिन क्र.केसी ३१३८०१२२२८३ तसेच होंडा कंपनीची सिबी यूनिकॉर्न दुचाकी वाहन ज्याचा नोंदणीकृत क्र.एमएच-२०- एचजी-३४३२, चेसिस क्र.एमई४ केसी४०७ डीएसए ०३७७०५, इंजिन क्र.केसी४० ईए ४०३७८२८ हे दोन्ही वाहन अर्जदार क्र.१ **साहेबराव पि.माधवराव गायकवाड** यांच्या नावे करण्यासाठी अर्जदार क्र.२ यांची कोणतीही हरकत नसून पुर्ण संमती आहे. अर्जदार क्र.२ हिने तिचा येणारा हिस्सा/वाटा हा अर्जदार क्र.१ **साहेबराव पि.माधवराव गायकवाड** यांच्या नावे सोडून दिलेला आहे.

त्याअर्थी, या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या नावे ते मयताचे वारसदार असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणास उजर अथवा आक्षेप असेल त्यांनी सदर जाहिर प्रगटन प्रसिद्धिपासून ३० दिवसांच्या आत या मा. न्यायालयात लेखी नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे ते मयताचे "वारस" असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप, ग्राहय धरला जाणार नाही.

करीता आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून**
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय
व.स्तर, औरंगाबाद

---

### जाहीर प्रगटन

## खुलताबाद येथील श्री.ए.ए.पांडे साहेब सह दिवाणी न्यायाधीश साहेब, कस्तर खुलताबाद यांच्या न्यायालयात

एम.ए.आर.जे.आय.नं.१७९/२०२६ पु.ता.०३/११/२०२६

**अर्जदार:**
१. **सुमनबाई भ्र.कृष्णा औटे, वय ७० वर्ष, धंदा:घरकाम**
रा.कसाबखेडा, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद
२. **सुनील पि.कृष्णा औटे, वय ४८ वर्ष, धंदा:शेती** रा.वरील प्रमाणे.
३. **पंकज पि.कृष्णा औटे, वय ४४ वर्ष, धंदा:शेती,** रा.वरील प्रमाणे.
४. **स्मिता पि.कृष्णा औटे, वय ४६ वर्ष, धंदा:घरकाम,** रा.वरील प्रमाणे.
५. **निलम भ्र.संतोष बांगर, वय ४२ वर्ष, धंदा:घरकाम**
रा.कात्रज पुणे, ता व जि पुणे.
६. **केसरबाई भ्र.प्रभाकर चव्हाण, वय ७० वर्ष, धंदा:घरकाम**
रा.गणोरी, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद

**विरूद्ध**

**गैरअर्जदार:-निरंक**
**विषय:- भारतीय वारसाहक्क कायद्याचे कलम ३७२ अन्वये वाहसक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत**
(Succession Certificate) **मिळणे बाबत.**

ज्या अर्थी, उपरोक्त अर्जदारांनी मा. न्यायालयात **ॲड.अब्बास पटेल** यांच्या मार्फत अर्ज केला आहे. की, मयत **पार्वताबाई भ्र.नामदेव औटे** हिचा मृत्यू दिनांक १०/०१/२०२६ रोजी कसाबखेडा, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथे झालेला आहे. तसेच मयत **पार्वताबाई भ्र.नामदेव औटे** हिचा पुतण्या नामे **कृष्णा पि.तोताराम औटे** यांचा मृत्यू **दि.** २५/०४/२०२६ रोजी कसाबखेडा, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथे झालेला आहे. मयत **पार्वताबाई भ्र.नामदेव औटे** यांना कोणतेही अपत्य जन्मास आलेले नव्हते त्यांचा सांभाळ हा त्यांचा पुतण्या मयत **कृष्णा पि.तोताराम औटे** यांनीच केलेला आहे तो सुध्दा झालेला आहे. तसेच मयत **कृष्णा पि.तोताराम औटे** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हे मुले आहे तसेच अर्जदार क्र.४ व ५ हया मुली आहे. तसेच अर्जदार क्र.६ ही बहिण आहे. मयत **कृष्णा पि. तोताराम औटे** यांचे आई वडिल व मयत **पार्वताबाई भ्र नामदेव औटे** यांचे पती हे फार वर्षापुर्वी मयत झालेले असुन अर्जदारांकडे ते मयत झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. मयतास अर्जदार हिच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत **पार्वताबाई भ्र.नामदेव औटे** यांच्या नावाने असलेले सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, शाखा कसाबखेडा, ता.खुलताबाद येथील शेती सुधारणासाठी कर्ज घेतले होते. त्यांचे **खाते क्र.२२७९३५९५३६** असे आहे. तसेच बॅकेचे कर्ज परतफेड करण्याकरिता अर्जदार यांना सदर बँकेकडून वारंवार मागणी होत आहे. त्याकरिता अर्जदार यांना वारसाहक्क प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या नावे ते मयताचे वारसदार असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणास उजर अथवा आक्षेप असेल त्यांनी सदर जाहिर प्रगटन प्रसिद्धिपासून ३० दिवसांच्या आत या मा. न्यायालयात लेखी नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे ते मयताचे "वारस" असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप, ग्राहय धरला जाणार नाही.

करीता आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून**
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,खुलताबाद

---

## दुष्काळी परिस्थितीमुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:**राज्यात दुष्काळाची छाया पसरली असल्याने महावितरणने संपूर्ण तांत्रिक यंत्रणेला हायअलर्ट'वर देत शासनाच्या दुष्काळ उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे सक्त आदेश दिले आहे. याबाबत महावितरणचे संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक जारी केले आहे.

यंदाच्या जून महिन्यापासून राज्यात पर्जन्यमानामध्ये मोठी तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सोबतच शेती पिकांचे नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत राज्य शासनाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार महावितरणने देखील राज्यभरातील तांत्रिक यंत्रणा सतर्क केली आहे.

मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या आदेशानुसार महावितरणचे संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह सर्व कार्यकारी संचालकांनी विविध परिमंडलांमध्ये तातडीने दौरे करून दुष्काळी परिस्थितीत कृषिपंपांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी विविध तांत्रिक कामांचा आढावा घेतला तसेच वीजयंत्रणेची पाहणी करून आवश्यक उपायांचे निर्देश दिले.

यासोबतच महावितरणने सर्व क्षेत्रीय कार्यालयातील अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचाऱ्यांना आपापल्या मुख्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. दुष्काळी परिस्थितीमध्ये प्रामुख्याने शेतीसह इतर सर्व ग्राहकांसाठी महत्त्वाचा असलेला वीजपुरवठा सुरळीत राहील याची विशेष खबरदारी घ्यावी. एखाद्या कारणामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्थेतून किंवा तातडीने दुरुस्ती कामे करून तो पूर्ववत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कामात हयगय करणाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

## डाक अदालत शुक्रवारी

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** टपाल विभागाच्या सेवांबाबत प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी शुक्रवार, दि. ९ रोजी सकाळी ११ वाजता प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या कार्यालयात डाक अदालत' आयोजित करण्यात आली आहे.ज्या तक्रारींचे सहा आठवड्यांच्या आत निवारण झालेले नाही किंवा समाधानकारक उत्तर मिळालेले नाही, अशा तक्रारींची या अदालतीत दखल घेतली जाणार आहे. संबंधितांनी आपल्या तक्रारी दोन प्रतींत मंगळवार दि. ६ पर्यंत प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ यांच्या नावे पाठवाव्यात. मुदतीनंतर प्राप्त तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे डाक विभागाने कळविले आहे.

---

**दैनिक सह्याद्री टाइम्स**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
OLD NAME
**MOHAMMED AMAN KHAN**
**MOHD HAFEEZULLAH KHAN**
TO
NEW NAME
**AHMED KHAN HAFIZ KHAN**
AS PER MY DOCUMENTS
**ADD: NEAR ROSHAN MASJID KIRADPURA AURANGABAD MAHARASHTRA-431001**

---

## श्री जुन्नेश्वर विद्यालयात गांधी-शास्त्री जयंती उत्साहात



**छत्रपती सभाजीनगर,प्रतिनिधी:** येथील श्री जुनेश्वर माध्यव उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा. बाबासाहेब गाडेकर, पर्यवेक्षिका सीमा मुंढे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक भगवानराव उबाळे होते.विद्यार्थिनी संस्कृती जाधव हिने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याविषयी विचार व्यक्त केले. मुख्याध्यापक भगवानराव उबाळे यांनी सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा व देशसेवेची मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले.जयंतीनिमित्त प्रशालेच्या परिसराची स्वच्छता करून स्वच्छता अभियानही राबविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संज्ञा बुचके हिने, तर आभार शिवकन्या दांडगे हिने मानले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पर्यावरण रक्षणाचा संदेश देत कालीका मित्र मंडळाचा वृक्षारोपण उपक्रम



**गंगापूर प्रतिनिधी** :पर्यावरण रक्षणाचा संदेश देत तसेच वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्याच्या उद्देशाने कालीका मित्र मंडळाच्या वतीने गुरुवार,दि.१ ऑक्टोबर रोजी नृसिंह मंदिर परिसरात वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात नगरसेवक राकेश कळसकर,नगरसेवक आनंद पाटील आणि नगरसेवक गटनेता संतोष आंबीलवादे यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.या प्रसंगी कालीका मित्र मंडळाचे सदस्य गोरख जावळे, किरण जोशी,दत्तू बुचडे गणेश वाडेकर संजय राऊत रवि भालेराव किरण सरोदे,अर्जुन कराळे,अक्षय कळसकर, केतन बुचडे,दीपक पदार,प्रीतम ठाकुर,योगेश कुरकुटे, योगेश कुंभकर्ण,गिरीश गंगापूर,महेश बिडकर यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संरक्षण करण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारली. कार्यक्रमाच्या शेवटी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. या स्तुत्य उपक्रमाला स्थानिक नागरिक व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण अत्यंत आवश्यक आहे.मात्र केवळ झाडे लावून आपले कर्तव्य संपत नाही,तर त्यांचे संगोपन करून ती जगवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने किमान एक झाड दत्तक घेऊन त्याची जबाबदारी स्वीकारली,तर भविष्यात हरित व प्रदूषणमुक्त परिसर निर्माण होण्यास मोठी मदत होईल.

**राकेश कळसकर:** नगरसेवक

---



समाजहितासाठी राबविण्यात येणारे वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीसारखे उपक्रम काळाची गरज आहेत.अशा विधायक कार्यांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो.भविष्यातही अशा सर्व सामाजिक उपक्रमांना माझे पूर्ण सहकार्य राहील आणि युवकांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

**आनंद पाटील:** नगरसेवक पती सामाजिक कार्यकर्ते

---



पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विशेषतः तरुणांनी पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे. वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संगोपन, स्वच्छता आणि प्रदूषण नियंत्रणासाठी युवकांनी सक्रिय सहभाग घेतल्यास भविष्यात हरित व निरोगी परिसर निर्माण होईल.

**संतोष अंबिलवादे:** नगरसेवक, गटनेता

---

## वीज कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना नाट्य स्पर्धेतून वाव

### सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे यांचे प्रतिपादन,महावितरणच्या नाट्य स्पर्धेस सुरुवात





**महावितरण नाट्य स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे. यावेळी मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी, राजाराम माने, मनीष ठाकरे व इतर मान्यवर तर दुसऱ्या छायाचित्रात जळगाव परिमंडलातर्फे सादर करण्यात आलेल्या वारी या नाटकातील एक दृश्य.**

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:**दैनंदिन कामाबाबत उत्साह वाढविण्यासोबतच कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी महावितरणच्या नाट्यस्पर्धेचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. कलावंतांना प्रेरणा मिळावी यासाठी रसिक प्रेक्षकांनी त्यांच्या सादरीकरणाला भरभरून दाद द्यावी, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे यांनी केले. तापडिया नाट्यमंदिरात आयोजित महावितरणच्या प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात गुरुवारी (१ ऑक्टोबर) अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी, नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता राजाराम माने, छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता मनीष ठाकरे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. यावेळी बावणे म्हणाले की, कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामकाजातील ताणतणाव दूर करण्यासाठी नाट्य स्पर्धा हे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. अशा स्पर्धांतून कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. यावेळी मुख्य अभियंता मुलाणी, माने व ठाकरे यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी परीक्षक डॉ.दिलीप घारे, योगिता महाजन, पद्मनाभ पाठक, प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, अधीक्षक अभियंता महेश पवार, विजय मोरे, बीना सावंत, शुभांगी कटकधोंड, उपसंचालक शशांक देशमुख, सहायक महाव्यवस्थापक प्रदीप सातपुते, शंकर कुलकर्णी, स्वागत समितीचे अध्यक्ष राजेंद्र नाहटा, सचिव मधुसूदन मराठे हेही उपस्थित होते. सूत्रसंचालन अविनाश सानप यांनी केले. आभार ज्ञानेश्वर आर्दड यांनी आभार मानले.स्पर्धेच्या पहिल्या दिवशी सादर झालेल्या 'वारी' व 'मिना' नाटकास प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सशक्त कथासूत्र, कलाकारांचा ताकदीचा अभिनय, चपखल नेपथ्य आणि आशयाला साजेसे संगीत यांच्या बळावर दोन्ही प्रयोगांनी पहिल्याच दिवशी स्पर्धेची रंगत वाढवली. जळगाव परिमंडलातर्फे सादर करण्यात आलेल्या समीर मोने लिखित 'वारी' हे नाटक सादर करण्यात आले. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या नाटकातून मंचावर अवतरले. माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या प्रवासाची वारी ही कालही तशीच होती. आजही तशीच आहे. संत-महात्म्यांच्या शिकवणीतून, अनुभवातून बोध घ्यायचा आणि आपल्या अस्तित्त्वाचा झेंडा रोवायचा, हा संदेश या नाटकातून देण्यात आला. दुसऱ्या सत्रात नांदेड परिमंडलातर्फे प्रमोद देशमुख लिखित 'मिना' नाटकाचा प्रयोग रंगला. ग्राहकांना सेवा देणाऱ्या महावितरणच्या अभियंते, तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन आयुष्यावर या नाटकातून प्रकाश टाकण्यात आला. ग्राहकांच्या अपेक्षा, त्यांना सेवा देण्याचे आव्हान, वीजचोरीविरोधातील कारवाईत येणारे अडथळे व त्यावर केलेली मात या नाटकातून दाखवण्यात आली.

---

## प्रसार भारतीच्या गोवा विभागात हिंदी पंधरवड्याची सांगता

**गोवा,प्रतिनिधी:**प्रसार भारतीच्या गोवा विभागात १४ ते ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या हिंदी पंधरवड्याची सांगता झाली. यानिमित्ताने आयोजित समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

---

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई निविदा मागवण्यात येत आहे टी - ०२, ०३ व ०४ अनुक्रमे सिल्लोड- १, २ व सोयगाव उपविभागातील लघुदाब घरघुती व वाणिज्य मीटर रीडिंग वाचन महावितरण मोबाईल ॲपद्वारे, बिल प्रिंटींग व वाटप करण्याच्या कामाकरीता निविदा विक्री कालावधी दि ०१.१०.२०२६ ते ०७.१०.२०२६. निविदा भरण्याची शेवटची तारीख दि.०७.१०.२०२६ रोजी ०४.०० वाजेपर्यंत. वरील निविदा कंपनीच्या www.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**PRO NO. 142** **कार्यकारी अभियंता, महावितरण, सिल्लोड विभाग**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना**

म.रा.वि.वि.कं. मर्या. विभागक्र-०२ अंतर्गत **Monthly meter reading,Bill Printing, bill Distribution upto consumer primises of LT consumer upto 20 KW under Ambad , Ghansawangi ,Partur , Mantha Subdivision under Jalna Division- II.** BILLING/EE/JLN-II/AMD/T-18 -mt/-39.03 lakh , BILLING/EE/JLN-II/GHN/T-19 Amt-23.60/-, BILLING/EE/JLN-II/PTR/T-20 Amt- 23.52 /- , BILLING/EE/JLN-II/MNT/T-21/2026-27 Amt - 16.78 /- ,या कामाकरिता ई- निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा विक्री कालावधी दि. ०२.१०.२०२६ ते दि. ०८.१०.२०२६ निविदा भरण्याची शेवटची तारीख दि.०८.१०.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत आहे. सदरील निविदा करिता कंपनीच्या **http://works.mahadiscom. in/eTender/etender** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**पीआरओ क्र. १४६** **कार्यकारी अभियंता, जालना-२.**

THIS NEWSPAPER IS PUBLISHED BY **ARCHANA SANDEEP KALE** FROM PLOT NO.489, SAMARTH KRUPA, N-1/F, BEHIND GARWARE STADIUM, NEAR POWER HOUSE, TOWN CENTER CIDCO, CHHAPTRAPATI SAMBHAJINAGAR (M.S.) 431003 ON BEHALF OF **ARCHANA SANDEEP KALE** EDITED BY **ARCHANA SANDEEP KALE** AND PRINTED BY **ARCHANA SANDEEP KALE** AT MANASI PRINTERS, PLOT NO. 45 A, SERVICE INDUSTRY SECTOR, CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR, MAHARASHTRA - ■ **Mob. No: 8459270916** ■ **Email-sahyadritimesaura@gmail.com** ■ **RNI No. MAHMAR/2003/10715**